तरूण भारत

# विद्यापीठ परीक्षा आजपासून पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार

कोल्हापूर : भारतीय हवामान खात्याने सातारा जिल्ह्याला अतिवृष्टीचा ऑरेंज अलर्टचा इशारा दिला होता. त्यामुळे जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सातारा यांनी पश्चिमेकडील तालुके (पाटण, महाबळेश्वर, जावळी, वाई आणि सातारा ) मधील सर्व माध्यमांच्या शाळा व महाविद्यालयांना



गुरुवारी सुट्टी जाहीर केली आहे. त्यामुळे एकही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये यासाठी शिवाजी विद्यापीठाने गुरुवारची सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा स्थगित केल्या. स्थगित परीक्षांचे नवीन वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर यथावकाश जाहीर करणार आहे. तथापि २१ जुलैपासूनच्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार होतील, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी दिली.

पुढारी

# विद्यापीठात आज राष्ट्रीय परिषद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञान स्रोत केंद्र, ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २१ जुलै रोजी एक दिवसीय राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. परिषदेत डॉ. मोहन खेरडे, डॉ. राजेंद्र कुंभार व प्रो. गुरुराज हडगाली मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी 'रिवॅम्पिंग लायब्ररीज इन मॉडर्न एरा' या विषयावर परिसंवाद होणार असल्याची माहिती उपग्रंथपाल डॉ. पी. बी. बिलावर यांनी दिली.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा आजपासून पूर्ववत

## दहावी, बारावी पुरवणी परीक्षा होणार

कोल्हापूर, ता. २० : अतिवृष्टीच्या इशाऱ्यामुळे शिवाजी विद्यापीठाने पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या आणि राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने दहावी, बारावीची पुरवणी परीक्षा आज स्थगित केली. या परीक्षा उद्या, शुक्रवारपासून पूर्ववत सुरू होणार आहेत.

विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सांगली, सातारा, कोल्हापूर जिल्ह्यातील महाविद्यालयांमधून पदवी, पदविका, पदव्युत्तर परीक्षा २५ मेपासून सुरु झाल्या आहेत. भारतीय हवामान खात्याने गुरूवारी (ता. २०) सातारा जिल्ह्याला अतिवृष्टीचा ऑरेंज अलर्ट दिला. त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी सातारा जिल्ह्यातील पश्चिमेकडील तालुके (पाटण, महाबळेश्वर, जावळी, वाई आणि सातारा ) मधील सर्व माध्यमांच्या शाळा व महाविद्यालयांना यादिवशी सुटी जाहीर केली. त्यामुळे कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये यासाठी विद्यापीठाच्या गुरूवारी होणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांच्या सर्व परीक्षा स्थगित केल्या. या परीक्षा शुक्रवारपासून पूर्ववत सुरू होणार आहेत.

> अतिवृष्टीच्या इशारामुळे स्थगित केलेल्या परीक्षांचे नवीन वेळापत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर लवकरच जाहीर करण्यात येईल. मात्र, शुक्रवारपासूनच्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार होतील.
>
> **-डॉ. अजितसिंह जाधव,**
> संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

एमबीए., एमसीए., आणि बी. फार्मसी अभ्यासक्रमांच्या परीक्षा होतील. एकूण १३०० विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. एम. ए. राज्यशास्त्र, बी. टेक., बायोटेक्नॉलॉजी, आदी विविध १४ अभ्यासक्रमांच्या परीक्षांचे निकाल आज जाहीर झाले. दरम्यान, दहावी आणि बारावीची पुरवणी परीक्षा पूर्ववत सुरू होईल. अतिवृष्टीच्या इशारामुळे ज्या विषयाचे पेपर स्थगित झाले. त्यातील दहावीचा पेपर २ ऑगस्टला, तर बारावीचा पेपर ११ ऑगस्टला घेण्यात येणार आहे, अशी माहिती राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे प्रभारी सचिव डी. एस. पोवार यांनी सांगितले.

21 JUL 2023
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा आजपासून सुरळीत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सांगली, सातारा व कोल्हापूर या तिन्ही जिल्ह्यांतील महाविद्यालयांमधून पदवी, पदविका तसेच पदव्युत्तर परीक्षा दि. २५ मे, २०२३ पासून सुरू झाल्या आहेत. दरम्यान, २१ जुलै, २०२३ पासूनच्या सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा पूर्वनियोजित वेळापत्रकानुसार होतील, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह एन. जाधव यांनी सांगितले आहे.

भारतीय हवामान खात्याने २० जुलै रोजी सातारा जिल्ह्याला अतिवृष्टीचा ऑरेंज अलर्टचा इशारा दिलेला असल्याने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण सातारा यांनी सातारा जिल्ह्यातील पश्चिमेकडील तालुके (पाटण, महाबळेश्वर, जावळी, वाई आणि सातारा) मधील सर्व माध्यमांच्या शाळा व महाविद्यालयांना दि. २० जुलै, २०२३ रोजी सुटी जाहीर केली होती. त्यामुळे कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहू नये यासाठी शिवाजी विद्यापीठाच्या दि. २० जुलै, २०२३ रोजी होणाऱ्या सर्व अभ्यासक्रमांच्या सर्व परीक्षा स्थगित करण्यात आल्या होत्या.

तरुण भारत

# विद्यापीठ परीक्षा सुरळीत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ अंतर्गत सुरू असलेल्या परीक्षेला बुधवारी ३ हजार ७५८ विद्यार्थी बसले होते. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यातील कॉलेजमध्ये एकही गैरप्रकार नोंद झालेला नाही. मास्टर ऑफ बिझनेस ॲडमिनिस्ट्रेशन, बॅचलर ऑफ फार्मसी, मास्टर ऑफ आर्ट, मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लीकेशन या अभ्यासक्रमांच्या परीक्षा झाल्या. तर आतापर्यंत ५१२ अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथकांची नियुक्ती केली आहे. तरी विद्यार्थ्यांनी परीक्षेत कोणताही गैरप्रकार करू नये, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव यांनी केले आहे.

Times of India

# SUK exams postponed due to rain

TIMES NEWS NETWORK

**Kolhapur:** Shivaji University Kolhapur (SUK) cancelled exams slated on Thursday due to heavy rains in Kolhapur, Sangli and Satara. Exams for MBA, BBA, MA and B Pharmacy may get impacted.

The decision was taken after the Satara district collector Jitendra Dudi on Thursday morning ordered to close down all educational establishments in the five tehsils of the district. The decision will now be reviewed on Friday.

Ajitsinha Jadhav, director of the exam and evaluation board of the university said, "We decided to hold exams as the district administration decided to shut schools and colleges."

He added, "University exams for most of the course are complete. Only exams for MBA, BBA, MA and B Pharmacy courses are on-going."

पुण्यनगरी

# संग्राम भालकर यांची निवड

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागामध्ये दिग्दर्शक-नृत्य दिग्दर्शक संग्राम भालकर यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली. त्यांना निवडीचे पत्र प्रभारी कुलसचिव व्ही. एन. शिंदे यांच्याकडून देण्यात आले. विद्यापीठ स्तरावर होणारे सांस्कृतिक उपक्रम, महाविद्यालयीन कार्यक्रम यासाठी तज्ज्ञ म्हणून भालकर यांचा उपयोग होणार आहे.



संग्राम भालकर